# मैत्रीचे अतूट बंध

मैत्रीचे सूर गवसले कधी,

उमजलेच नाही मजला.

मैत्रीचे बंध गुंफले कधी,

उमजलेच नाही मजला.

ते विक्षिप्त वागणे,

कधी खिन्न करी मनाला.

ते निःशब्द राहणे,

कधी व्याकूळ करी मनाला.

पण हृदयाचा कौल न मिळे मनाला

रूसवा फुगवा क्षणिक असतो सारा,

स्मित हास्याची एक फुंकर

पुन्हा रिझवी हळव्या मनाला.

विश्वासाची,प्रेमाची झालर ह्या मैत्रीला,

सोनेरी क्षणांच्या आठवणींची

सोबत ह्या आयुष्याला.

दृष्ट न लागो ह्या अतूट नात्याला,

हेच मागणे त्या विधात्याला !

- भाग्यश्री प्रभूतेंडोलकर